# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील आदिवासी विकास विभागातील शासकीय योजनेचा लाभ मिळत नसल्याबाबत

**(१) ८०४६ (१०-०४-२०१५). श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील आदिवासी विकास विभागातील ४३ विद्यार्थ्यांना शासकीय योजनेचा लाभ मिळत नसल्याने त्यांनी माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान आमरण उपोषण केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार विद्यार्थ्यांना शासकीय योजनेचा लाभ मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०३-०२-२०१६) :**(१) रायगड जिल्हयातील पेण प्रकल्पांतर्गत आदिवासी मुला-मुलींच्या शासकीय वसतीगृहातील विद्यार्थ्यांनी त्यांच्या विविध मागण्यांकरीता पनवेल, जि.रायगड येथील मुलांच्या शासकीय वसतीगृहात दि.१९.१२.२०१४ रोजी सायंकाळपासून उपोषण सुरु केले होते, ही बाब खरी आहे.

(२) सह आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांनी दिनांक २०.१२.२०१४ रोजी व आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांनी दि.२२.१२.२०१४ रोजी पनवेल येथे सामुहीक उपोषणास बसलेल्या विद्यार्थ्यांची भेट घेऊन त्यांच्या मागण्यांसंबंधी चर्चा केल्यानंतर विद्यार्थ्यांनी उपोषण मागे घेतले.

(३) विभागाच्या दि.११.११.२०११ च्या शासन निर्णय व दि.१०.०४.२०१३ रोजीच्या शासन शुध्दिपत्रकानुसार व उपलब्ध जागेनुसार वसतीगृहातील विद्यार्थ्यांना मुलभूत सोयी-सुविधा पुरविल्या जात आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण-शिळफाटा हा रस्ता राष्ट्रीय महामार्ग क्र.३ व ४ ला जोडणारा असून या मार्गावर उन्नत मार्ग बांधण्याबाबत**

**(२) ९८६७ (१०-०४-२०१५). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-शिळफाटा हा रस्ता राष्ट्रीय महामार्ग क्र.३ व ४ ला जोडणारा असून त्यांची क्षमता संपल्याने सदर मार्गावर उन्नत मार्ग बांधण्याचा प्रस्ताव राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला पाठविण्याच्या विचाराधीन बाबींवर निर्णय घेण्यात आला आहे काय,
(२) असल्यास, उक्त निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,
(३) सदर रस्त्यांच्या बांधकामास किती खर्च अपेक्षित आहे व त्यासाठी किती निधीची आवश्यकता आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (१९-०७-२०१६) :** (१) व (२) सदरहु रस्ता भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अखत्यारितील नाही. कल्याण-शिळफाटा रस्त्यावर उन्नत मार्ग बांधणे या प्रकल्पासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास अंमलबजावणी यंत्रणा म्हणून घोषित करण्याच्या प्रस्तावास मंत्रीमंडळ पायाभूत सुविधा समितीने मंजुरी दिली आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून सविस्तर प्रस्ताव प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(३) महामंडळाचे ढोबळ अंदाजानुसार सदर रस्त्याचे बांधकामाची अंदाजित किंमत रु. २७६० कोटी अपेक्षित आहे.

---

**मुंबई-पुणे द्रुतगतीमार्गावर वाहतूक सुरळित करण्यासाठी मोठ्या क्रेनची आवश्यकता असल्याबाबत**

**(३) १२४१४ (१०-०४-२०१५). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई- पुणे द्रुतगती मार्गावर अवजड वाहनांचे वारंवार होणारे अपघात लक्षात घेता अवजड वाहने बाजूला करुन वाहतूक सुरळीत करण्यासाठी मोठ्या क्रेनची आवश्यकता असल्याचे महामार्ग पोलिसांनी अनेकवेळा आयआरबीला सांगूनही त्याकडे दुर्लक्ष केल्यामुळे दिनांक ७ जानेवारी, २०१५ रोजी झालेल्या अपघातातील अवजड वाहने बाजूला करण्यात आल्याने महामार्गावरील वाहतूक तब्बल सात तास खोळंबण्यात आली हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(३) त्यानुसार मोठ्या क्रेन उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (१९-०७-२०१६) :** (१) नाही.
(२) दिनांक ०७.०१.२०१५ रोजीच्या अपघातात मुंबई कडे जाताना सकाळी ट्रांझिट मिक्सर अज्ञात वाहनास मागच्या बाजूने धडकला आणि मध्य मार्गिकेवर बंद पडला. सदर अपघात

घाट भागात झाल्याने तेथे मर्यादित जागा उपलब्ध होती, त्यामुळे अपघातग्रस्त वाहनाला बाजूला करण्यासाठी क्रेन कार्यान्वित करण्यास व मदतकार्य पोहचविण्यास वेळ लागला.

(३) मुंबई पूणे दुतगती मार्गावर देखभाल व दुरुस्ती कंत्राटदार MIPL मार्फत खालील चार ठिकाणी क्रेन उपलब्ध करुन दिलेल्या आहेत.

(१) खालापूर टोल प्लाझा येथे १४ मे.टन क्रेन.

(२) दस्तुरी पोलीस स्टेशन येथे १४ मे.टन क्रेन.

(३) कुसगाव (लोणावळा) येथे ५० मे.टन पुलर (मोठी क्रेन)

(४) उसे टोल प्लाझा १४ मे.टन क्रेन.

---

**राज्यातील सर्वच पुलांचे बांधकाम दुय्यम दर्जाचे काम झाल्याबाबत**

**(४) १९२१७ (३१-०७-२०१५). श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्वच पुलांचे बांधकाम करताना रस्ते विकास महामंडळाने ज्या ठेकेदाराला पुलाचे काम दिले, त्याने पुलाचे कामामध्ये दुय्यम दर्जाचे व स्वस्त किंमतीत म्हणजे ४० टक्के कमी दराने मिळणारे दाबनियंत्रक वापरल्याने पुलांची सुरक्षितता धोक्यात आल्याचे, महामंडळाने केलेल्या तपासणीमध्ये उघडकीस आल्याने सदरचे दाब नियंत्रक बदलण्याच्या सुचना महामंडळाने देवून ही त्याची अंमलबजावणी ठेकेदाराने केली नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१३ च्या सुमारास आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दाबनियंत्रक बदलण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच संबंधित ठेकेदारावर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१९-०७-२०१६) :** (१) नाही.

(२) व (३) नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमळनेर (जि.जळगांव) येथील आदिवासी ठाकूर जमातीला**
**अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

**(५) १९९८७ (३१-०७-२०१५). श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमळनेर (जि.जळगांव) येथील आदिवासी ठाकूर जमातीला अनु.जमातीचे जात प्रमाणपत्र

मिळण्यासाठी आदिवासी ठाकूर जमातीतर्फे प्रांताधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्यात आले असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जळगांव जिल्हयात ठाकुरांना जातप्रमाणपत्राचे नियमानुसार वाटप होत असतांना अमळनेरात जातप्रमाणपत्र प्रलंबित ठेवण्यामागची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, व तदनुसार शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१९-०७-२०१६) :** (१) होय.

(२) व (३) महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियम) नियम, २००३ मधील नियमानुसार अर्जदारांच्या जात प्रमाणपत्राच्या अर्जासोबत आवश्यक असलेले जात पुराव्यांचे कागदपत्र अपूर्ण असल्याने जातीचे प्रमाणपत्र अपूर्ण असल्याने जातीचे प्रमाणपत्र देण्यात आली नव्हती. संबंधित अर्जदार यांनी आवश्यक कागदपत्रे सादर केल्यानंतर त्यांना जात प्रमाणपत्र देण्यात आली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जलंब (ता.शेगाव) येथील मंजूर झालेल्या रेल्वे क्रॉसिगवर रोड ओव्हर ब्रिजचे काम सुरु करण्याबाबत

**(६) २१६८० (३०-११-०००२). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे जलंब (ता.शेगांव) कडे जाणा-या रस्त्यावर रेल्वे रूळावर जाणारा पुल मंजूर झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर काम सुरु न होण्याची कारणे काय आहेत तसेच याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (३०-११-०००२) :** (१) होय.

(२) व (३) प्रश्नांकित पूलाचे सविस्तर सर्वेक्षण करुन मांडणी नकाशा तयार करण्यात आला आहे. या मांडणी नकाशास मंजूरी प्रदान करण्यात आली आहे. या नकाशावर आधारीत प्रकल्पाचे सविस्तर अंदाजपत्रक तयार करण्याचे काम प्रगतीत आहे. सदर काम माहे ऑक्टोबर, २०१६ अखेर सुरु करण्याचे नियोजन आहे.

---

### पुण्यातील आर्यभूषण प्रेसची जागा 'विकास कामांसाठी' वापरण्याबाबत

**(७) २४१०३ (१३-०८-२०१५). श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यातील आर्यभूषण प्रेसची जागा 'विकास कामांसाठी' वापरण्यासंदर्भात महाराष्ट्र सहकारी मुद्रणालयाने केलेल्या व्यवहारांसंदर्भात चौकशी करण्याचे आदेश राज्याच्या अपर निबंधकांनी दिले असल्याचे माहे मे, २०१५ च्या तिस-या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) महाराष्ट्र सहकारी मुद्रणालयाने जळगाव येथील एका उद्योजकाशी करार केला असून त्याअंतर्गत उद्योजक साडेचार कोटींची गुंतवणूक करणार असून, त्याबदल्यात त्याला प्रेसच्या आवारातील पंधरा हजार स्क्वेअर फूट जागा दिली जाणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१२-०७-२०१६) :**(१) होय.

(२) होय.

(३) सदर संस्थेच्या तपासणीअंती महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम ७९ (अ) नुसार सदर करार रद्द करण्याबाबतचा प्रस्ताव सहकार आयुक्त कार्यालयाने सादर केला आहे. त्यावर पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) लागू नाही.

---

### बँकेकडे सोने तारण ठेवून कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांना कर्ज माफीतून डावलण्यात आल्याबाबत

**(८) २८४२३ (२२-१२-२०१५). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेतकऱ्यांची सावकारी कर्जातून सुटका करण्याचा शासनाने निर्णय घेवूनही शेतकरी कर्जातून मुक्त झाला नसल्याची बाब, माहे ऑगस्ट, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आली हे खरे आहे काय.

(२) असल्यास सावकाराकडे सोने गहाण ठेवून कर्ज घेतले असेल, अशा शेतकऱ्यांचे सावकारी कर्ज माफ करण्याचा शासनाने निर्णय घेतला असला तरी, अनेक शेतकऱ्यांनी आपल्या परिसरातील राष्ट्रीयकृत, सहकारी बँकाकडे आपले सोने तारण ठेवून, शेतीकरीता कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांच्या, कर्जमाफीचा निर्णय शासनाने घेतला नसल्यामुळे अशा शेतकऱ्यांवर अन्याय झाला आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास,याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीअंती बँकांचेही कर्ज माफ करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२६-०७-२०१६) :** (१) नाही.

विदर्भ व मराठवाडयातील परवानाधारक सावकाराकडून शेतक-यांनी घेतलेल्या कर्जास माफी देण्याबाबत शासनाने दिनांक १०.४.२०१५ अन्वये निर्णय घेतलेला आहे. शासन निर्णयातील लाभार्थीच्या पात्रतेच्या निकषानुसार पात्र कर्जदार शेतक-यांना कर्जमाफी देण्यात आली आहे.

(२) दिनांक १०.४.२०१५ चा शासन निर्णय फक्त विदर्भ सावकारांकडून शेतक-यांनी घेतलेल्या कर्जास माफी देण्याबाबतचा आहे. केंद्र शासनाने सन २००८ मध्ये व राज्य शासनाने २००९ मध्ये शेतक-यांनी बँकेकडून घेतलेल्या कर्जास कर्जमाफीचा लाभ दिलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान भरपाई मिळण्याबाबत**

**(९) २९३२६ (१५-०१-२०१६). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील शेतकऱ्यांनी प्रतिकूल परिस्थिती असतानासुध्दा तंत्रज्ञानाचा वापर करीत शेडनेटमध्ये ढब्बू मिरचीची लागवड केली, मात्र बाजारपेठ आवक वाढल्याने ढब्बू मिरचीच्या दरात घट निर्माण झाली असल्याने येथील शेतकरी चिंताग्रस्त झाला असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने शेतकऱ्याना आर्थिक नुकसान भरपाई मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२७-०७-२०१६) :**(१) नाही.

मंगळवेढा बाजार समितीमध्ये ढब्बू मिरचीची आवक नाही. सोलापूर जिल्ह्यातील बार्शी, पंढरपूर व सोलापूर या प्रमुख बाजार समित्यामध्ये ढब्बू मिरचीची आवक व दर पुढीलप्रमाणे आहे.

| | ऑगस्ट, २०१५ | | सप्टेबर, २०१५ | | ऑक्टोबर, २०१५ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | आवक (क्विं) | दर रु. | आवक (क्विं) | दर रु. | आवक (क्विं) | दर रु. |
| **बार्शी** | १३५ | १२०० | ९९ | १२०० | १०२ | १००० |
| **पंढरपूर** | ३२५ | १६५० | ३८४ | ११५० | २२८ | १००० |
| **सोलापूर** | ६८४ | १२०० | ८३८ | ९०० | ४९६ | १००० |

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील सहकारी बँकाचे अस्तित्व टिकविण्याबाबत**

**(१०) २९९२० (२२-१२-२०१५). श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.वारीस पठाण (भायखळा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गांधी अहवालाच्या शिफारशीनुसार राज्यातील सहकारी बँकावर जाचक अटी लावून सहकार चळवळ संपविण्याचा प्रयत्न रिर्झव्ह बँकेकडून केला जात आहे. या समितीच्या अहवालाला दि महाराष्ट्र अर्बन को- ऑपरेटीव्ह फेडरेशनने विरोध केला असून १८ सप्टेंबर, २०१५ ला सर्व नागरी सहकारी बँकाकडून निषेध दिन पाळला जाणार असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सावकारीला पर्याय म्हणून शेतकरी आणि छोट्या उद्योजकांसाठी निर्माण झालेल्या सहकारी बँकानी आर्थिक क्रांती केल्याचे योगदान विचारात घेऊन सरसकट सर्वच सहकारी बँकाचे व्यापारी बँकात रुपांतर करणे सहकाराला नख लावल्यासारखे असल्याने या प्रकरणी शसनामार्फत दूरगामी धोरण तसेच सहकारी बँकांचे अस्तित्व टिकवण्यासाठी शासनामार्फत उपाययोजना करण्याचे प्रस्तावित आहे, हे खरे आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुभाष देशमुख (०२-०८-२०१६) :** (१) होय.
रिझर्व्ह बँकेचे डेप्युटी गव्हर्नर यांनी सादर केलेल्या अहवालातील काही शिफारशींच्या विरोधात काही नागरी सहकारी बँका व त्यांच्या संघीय संस्था यांचेकडून दिनांक १८.९.२०१५ रोजी निषेध दिन पाळला गेला.
(२) सदर अहवालामधील शिफारशी स्विकृत करुन त्यानुषंगाने अंमलबजावणी करण्याची बाब रिझर्व्ह बँकेच्या स्तरावरील आहे. या संदर्भात बँकांच्या संघीय संस्थांकडून निवेदन प्राप्त झाल्यास रिझर्व्ह बँकेच्या स्तरावर सदर बाब शासनाकडून मांडली जाईल.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मंगळवेढा (ता.जि.सोलापूर) येथील २० परवानाधारक सावकार असून त्यापैकी एकाही सावकाराच्या हिशोब वहीत शेतीसाठी दिलेल्या कर्जाची नोंद आढळून आली नसल्याबाबत**

**(११) ३०९८७ (२२-१२-२०१५). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढा ता.जि.सोलापूर २० परवानाधारक सावकार असून त्यापैकी एकाही सावकाराच्या हिशोब वहीत शेतीसाठी दिलेल्या कर्जाची नोंद आढळून आली नाही तसेच तालुक्याती ४५ हजार ३१४ शेतकरी असून यापैकी एकाही शेतकऱ्याला सावकारी कृषी कर्जाचा लाभ मिळाला नसल्याने शासनाच्या सावकारी कर्जमाफीच्या घोषणा फक्त नावालाच असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सहकारी विभागाच्या पथकाने मंगळवेढा शहरातील ९ व तालुक्यातील ११ अशा २० परवानाधारक सावकारांच्या दफ्तरांमध्ये शेतीसाठी कर्ज दिले नसल्यासची नोंद सापडत नसल्याने सावकारी कर्जमाफी घोषणेचा मंगळवेढा तालुक्यात एकाही शेतकऱ्याला लाभ मिळाला नाही, हे खरे आहेकाय

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२६-०७-२०१६)** :(१) परवानाधारक सावकारांकडून शेतक-यांनी घेतलेल्या कर्जास माफी देण्याबाबत शासनाने दिनांक १०.४.२०१५ अन्वये घेतलेला निर्णय फक्त विदर्भ व मराठवाड्यातील शेतक-यांसाठी जाहीर करण्यात आलेला आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शासनाने जाहीर केलेल्या एकरकमी कर्ज परतफेड योजनेबाबत**

**(१२) ३१३५१ (२२-१२-२०१५). श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात भूविकास बँकेचे कर्ज घेतलेल्या शेतक-यांना त्यांच्या सातबाऱ्यावरील कर्जाचा बोजा कमी करण्यासाठी शासनाने एकरकमी कर्ज परतफेड योजना जाहीर केली यामुळे राज्यातील ३५ हजार शेतक-यांना तब्बल ७१३ कोटींचा दिलासा मिळणार असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजना यशस्वी करण्यासाठी सदर बँकांकडून कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांना प्रोत्साहित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. सुभाष देशमुख (२९-०७-२०१६)** :(१) अंशतः खरे आहे

शेतक-यांनी भूविकास बँकेकडून घेतलेल्या कर्जाच्या वसूलीच्या अनुषंगाने शासनाने दिनांक २४.०७.२०१५ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे. सदर एकरकमी कर्ज परतफेड योजनेस दिनांक ३१.३.२०१७ पर्यत मुदतवाढ देण्यात आली असून त्यानूसार कार्यवाही सुरु आहे. या योजनेचा फायदा ३७,७६६ कर्जदार शेतक-यांना होणार आहे.

(२) सदर योजनेचा लाभ घेणेबाबत सर्व शेतक-यांना जाहीर आवाहन करणेबाबत सर्व विभागीय सहनिबंधक व जिल्हा उपनिबंधक यांना कळविण्यात आले असून या योजनेअंतर्गत किती मुद्दल व व्याज भरावे लागेल याची वैयक्तिक माहिती प्रत्येक कर्जदार शेतक-यांला पाठविण्याबाबत सर्व जिल्हा उपनिबधंक तथा अवसायक यांना कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**लोकशाहीर अण्णाभाऊ साठे महामंडळातील गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(१३) ३२५१३ (१८-०१-२०१६). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोकशाहीर अण्णाभाऊ साठे महामंडळातील ३८५ कोटी रुपयांच्या गैरव्यवहार प्रकरणी सी.आय.डी. तर्फे आरोपपत्र दाखल करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी किती आरोपींवर आरोपपत्र दाखल करण्यात आले आहे,

(३) असल्यास, उक्त भ्रष्टाचार प्रकरणी ७४ अधिका-यांना कारणे दाखवा नोटीस सामाजिक न्याय विभागांनी बजावल्याची माहिती माहे ऑक्टोबर, २०१५ च्या दुस-या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(४) तसेच उक्त अधिका-यांना कारणे दाखवा नोटीसला दोन दिवसाची मुदत उत्तर देण्यासाठी दिली असून त्यानंतर समाधानकारक खुलासा न आल्यास या अधिका-यांना शासन निलंबित करणार काय,

(५) असल्यास, उक्त कारवाईचे स्वरुप काय आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२१-०७-२०१६) :**(१) होय.

(२) साहित्यरत्न लोहशाहीर अण्णाभाऊ साठे महामंडळातील भ्रष्टाचार प्रकरणी सी.आय.डी.ने आतापर्यंत तपासाअंतर्गत तत्कालीन अध्यक्ष श्री.रमेश कदम तसेच महामंडळाच्या एकूण ५ अधिकारी/कर्मचा-यांवर आरोपपत्र दाखल केले आहे.

(३) साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे महामंडळामध्ये सन २०१२-१३ ते २०१४-१५ या कालावधीत नियमबाहय भरती केलेल्या ७४ कर्मचा-यांना महामंडळामार्फत कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

(४) महामंडळातील नियमबाहय भरती प्रकरणी अंतिम नोटीसी विरोधात उच्च न्यायालयात १०, कामगार न्यायालयात ३० व औद्योगिक न्यायालयात २० असे एकूण ६० कर्मचारी विविध न्यायालयात गेले असून प्रकरण न्याय प्रविष्ट आहे. त्यापैकी मा.न्यायालयाने स्थगिती उठविल्याने आतापर्यंत २० कर्मचाऱ्यांना निलंबित केले आहे. उर्वरित कर्मचा-यांवर कार्यवाही करणे प्रस्तावित आहे.

(५) प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

---

**कर्जत, खालापूर तालुक्यातील (जि.रायगड) नदीवरील पुलाचे संरक्षण कठडे नसल्याबाबत**

**(१४) ३३५३८ (२२-१२-२०१५). श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत, खालापूर तालुक्यातील (जि.रायगड) नदीवरील पुलाचे संरक्षण कठडे नसल्याने

तसेच पावसाळ्यामध्ये सतत पाणी पुलावरुन जात असल्याने पुल कमकुवत झाले असल्याची बाब तेथील ग्रामस्थ व लोकप्रतिनिधी यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग,अलिबाग यांच्याकडे वारंवार मागणी करुन सुध्दा अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही केली नाही, हे खरे आहे काय,
(२) तसेच पुलाच्या मजबूतीकरण तसेच संरक्षण कठडे बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२१-०७-२०१६)** :(१) निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
(२) कर्जत व खालापूर तालुक्यातील सा.बां. विभागाच्या अखत्यारीतील रस्त्यावर २१ पूल आहेत. या पूलांपैकी एका पुलाचे क्षतिग्रस्त झालेले संरक्षक कठडे दुरुस्त करण्यात आले आहेत. सध्या सर्व पूल कठड्यासहीत/रेलींग सहित सुस्थितीत आहेत व या पूलांवरुन वाहतूक सुरळीत सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळाचे राज्यातील पूर्ण व्यवहार बंद असल्याने दुर्बल घटकांची गैरसोय होत असल्याबाबत**

**(१५) ३४६४५ (१८-०१-२०१६). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळाचे नागपूर आणि राज्यातील पूर्ण व्यवहार ठप्प असल्याने कर्जाची शेकडो प्रकरणे प्रलंबित असून उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती प्रक्रिया बंद झाल्यामुळे दुर्बल घटकांची मोठी गैरसोय होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त महामंडळात मागील तीन वर्षापासून कर्ज प्रक्रिया बंद झाल्यामुळे समाज घटकांतील गरजू लाभ धारकांवर अन्याय होत आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महामंडळाचे सर्व व्यवहार सक्षमपणे चालू करण्यासाठी शासनाने काही उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२१-०७-२०१६)** :(१) नाही.
(२) नाही.

सन २०१३-१४ ते २०१५-१६ या वर्षात शैक्षणिक कर्ज योजनेअंतर्गत राबविण्यात आलेल्या योजनांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे :-

| १) विशेष केंद्रीय अर्थसहाय्य योजना: | | (रु. लाखात) | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | सन | कर्ज वितरणाचा तपशिल | |
| | | लाभार्थी संख्या | खर्च रक्कम रु. |
| १ | २०१३-१४ | १८७० | ८९२.१० |
| २ | २०१४-१५ | ६०३ | २४४४.१८ |
| ३ | २०१५-१६ | २९२५ | ३२०.२० |
| एकूण | | ५३९८ | ३६५६.४८ |

| २) बीजभांडवल योजना : | | (रु. लाखात) | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | सन | कर्ज वितरणचा तपशिल | |
| | | लाभार्थी संख्या | खर्च रक्कम रु. |
| १. | २०१३-१४ | ७५१ | ८३२.२६ |
| २. | २०१४-१५ | ३८५ | ४९३.७० |
| ३. | २०१५-१६ | २७८ | ४६०.५४ |
| एकूण | | १४१४ | १७८६.५० |

| ३) थेट कर्ज योजना : | | (रु. लाखात) | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | सन | कर्ज वितरणाचा तपशिल | |
| | | लाभार्थी संख्या | खर्च रक्कम रु. |
| १. | २०१३-१४ | -- | -- |
| २. | २०१४-१५ | ८११२ | १६५२.३० |
| ३. | २०१५-१६ | -- | -- |
| एकूण | | ८११२ | १६५२.३० |

| ४) एनएसएफडीसी मुदत कर्ज योजना : | | (रु. लाखात) | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | सन | कर्ज वितरणचा तपशिल | |
| | | लाभार्थी संख्या | खर्च रक्कम रु |
| १. | २०१३-१४ | ८४१ | ६३३.०५ |
| २. | २०१४-१५ | ११०२ | २१४७.१९ |
| ३. | २०१५-१६ | ५ | ३.१५ |
| एकूण | | १९४८ | २७८४.१९ |

| ५) महिला समृध्दी योजना : | | (रु. लाखात) | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | सन | कर्ज वितरणाचा तपशिल | |
| | | लाभार्थी संख्या | खर्च रक्कम रु. |
| १. | २०१३-१४ | ५४०६ | २१७७.८४ |
| २. | २०१४-१५ | १३१७९ | ३२६४.५० |
| ३. | २०१५-१६ | ० | ०.०० |
| | एकूण | १८५८५ | ५४४२.३४ |

| ६) लघुऋण वित्त योजना : | | (रु.लाखात) | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | सन | कर्ज वितरणाचा तपशिल | |
| | | लाभार्थी संख्या | खर्च रक्कम रु |
| १. | २०१३-१४ | ५३ | १२.६० |
| २. | २०१४-१५ | १११ | ९.७७ |
| ३. | २०१५-१६ | ० | ०.०० |
| | एकूण | १६४ | २२.३७ |

| ७) शैक्षणिक कर्ज योजना : | | (रु.लाखात) | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | सन | कर्ज वितरणाचा तपशिल | |
| | | लाभार्थी संख्या | खर्च रक्कम रु. |
| १. | २०१३-१४ | २०३ | २०१७.७४ |
| २. | २०१४-१५ | १२ | ३३.८९ |
| ३. | २०१५-१६ | १ | १३.८५ |
| | एकूण | २१६ | २५४.८८ |

(३) सन २०१५-१६ मध्ये महामंडळाच्या कारभारबाबत सीआयडी मार्फत चौकशी सुरु असून कारभारावर काहीसा परिणाम झाला आहे. तथापि, महामंडळाचे कामकाज आणखी सक्षमपणे चालू करण्यासाठी महामंडळामार्फत आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

**राज्यातील किरकोळ व्यापाऱ्यांना अत्यावश्यक सेवा कायद्याच्या कक्षेत आणण्याच्या प्रस्तावाबाबत व अत्यावश्यक वस्तू अधिनियमाच्या अंमलबजावणीबाबत**

**(१६) ३५३२५ (२१-१२-२०१५). श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकिय नियमांवर बोट ठेवून व्यापाऱ्यांना होणा-या त्रासापासून संरक्षण मिळावे आणि उत्पादक ते ग्राहक या साखळीतील उपेक्षा दूर व्हावी व किरकोळ व्यापा-यांवर संप, मोर्चे बंद किंवा अन्य परिस्थिती दुकाने बंद ठेवून थेट किंवा अप्रत्यक्षपणे सरकार विरोधी आंदोलनांना पाठींबा देणा-या किरकोळ व्यापा-यांवर कारवाई करण्याचा तसेच राज्य भरातील किरकोळ व्यापारी अत्यावश्यक सेवा कायद्याच्या कक्षेत आणण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावाचा मसूदा काय आहे व त्यावर शासनाने निर्णय घेतला आहे काय,

(३) तसेच राज्यात जीवनावश्यक वस्तुंच्या किंमतीवर नियंत्रण मिळविण्यासाठी शासनाने अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५ ची अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, प्रश्न भाग (१) मधील निर्णय घेतला असल्यास अंमलबजावणीची सद्य:स्थिती काय आहे वा त्यासाठी किती कालावधी अपेक्षित आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१९-०७-२०१६)** : (१) व (२) शासन निर्णय क्र. किविधो-२०१५/प्र.क्र.११३/उद्योग-२, दिनांक १०/०२/२०१६ अन्वये "राज्याचे किरकोळ व्यापर धोरण-२०१६" जाहीर करण्यात आले आहे.

सदर धोरणानुसार "खाद्य व किराणा व्यवसायातील फक्त नाशवंत मालाचा समावेश अत्यावश्यक सेवेमध्ये अंतर्भाव करण्यात येईल", अशी तरतूद आहे.

(३) जीवनावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ हा कायदा अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या अखत्यारीतील असून सदर कायद्याअंतर्गत सार्वजनिक वितरण प्रणालीतील फक्त रास्तभाव व केरोसीन परवानधारकांवर कार्यवाही करण्यात येते. सामान्य प्रशासन विभागाकडून "महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परिक्षण अधिनियम (MESMA) कायदा दिनांक ०३/०८/२०१२ पासून राज्यात ५ वर्षाच्या कालावधीकरिता लागू करण्यात आला आहे. सदर कायद्याखाली ज्या सेवा अत्यावश्यक सेवा म्हणून घोषित करण्यात आल्या आहेत त्या सेवा कलम क्र. २ (क) (एक) ते (सहा) येथे नमूद करण्यात आल्या आहेत.

(४) दिनांक १०/०२/२०१६ च्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने सदर धोरणाची अंमलबजावणी करण्याच्या सूचना संबंधित विभागांना देण्यात आलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मराठवाड्यातील कैकाडी समाजाला आंध्रप्रदेश राज्याप्रमाणे अनुसूचित जमातीच्या (एस.टी.) सवलती व दर्जा देण्याबाबत**

**(१७) ३६५७६ (२२-१२-२०१५). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यातील कैकाडी समाजाला आंध्रप्रदेश राज्याप्रमाणे अनुसूचित जमातीच्या (एस.टी.) सवलती व दर्जा देण्यात याव्यात अशी मागणी दि.१४ ऑक्टोबर, २०१५ रोजी मा.आदिवासी विकास मंत्री यांचेकडे तसेच दिनांक ०४ नोव्हेंबर, २०१५ रोजी मा.मुख्यमंत्री यांचेकडे लोकप्रतिनिधींनी केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(३) अद्याप कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१९-०७-२०१६) :**(१) होय.

(२) व (३) कैकाडी समाज केंद्र शासनाने विहित केलेले अनुसूचित जमातीचे निकष पूर्ण करत नसल्याने त्यांचा समावेश महाराष्ट्र राज्याच्या अनुसूचित जमातीच्या यादीमध्ये करण्यात आलेला नाही.

---

**चंद्रपूर जिल्ह्यातील माणिकगड व अंबुजा (मराठा) सिमेंट उद्योगांमध्ये स्थानिक बेरोजगार उमेदवाराना नोकरीत सामावून घेण्याबाबत**

**(१८) ३६६६७ (२२-१२-२०१५). ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील कोरपाना व राजुरा तालुक्यालगत माणिकगड व अंबुजा (मराठा) सिमेंट उद्योगामध्ये स्थानिक सुशिक्षित व आय.टी.आय. प्रशिक्षित बेरोजगार उमेदवारांना डावलले जात असल्याने अनेक आंदोलने व वृत्तपत्रातून निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक उद्योगांमध्ये स्थानिक बेरोजगार उमेदवाराना नोकरी सामावून घेण्यासाठी शासनाकडून करार करण्यात आलेला होता, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उद्योगांकडून स्थानिक बेरोजगार उमेदवारांना डावलल्याने त्यांच्यावर अन्याय केला जात आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, यावर शासन कोणती उपाययोजना करत आहे वा करणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२८-०७-२०१६) :**(१) यासंदर्भात उद्योग संचालनालय वा जिल्हा उद्योग केंद्र, चंद्रपूर यांच्याकडे कोणतीही तक्रार प्राप्त झाली नाही.

(२) होय.

(३) हे खरे नाही

माणिकगड व अंबुजा (मराठा) सिमेंट उद्योगामध्ये स्थानिक लोकाचे प्रमाण दि. १७.११.२००८ च्या शासन निर्णयानुसार २०१५ अखेर अनुक्रमे ८३.८४% व ८४% आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सामाजिक न्याय विभागाच्या नांदेड येथील वसतीगृहात भोजन व्यवस्थेवरील ठेकेदार निकृष्ठ दर्जाचे भोजन देत असल्याबाबत

**(१९) ३७८८६ (२३-१२-२०१५). डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामाजिक न्याय विभागाच्या नांदेड येथील वसतीगृहात भोजन व्यवस्थेवरील ठेकेदार निकृष्ठ दर्जाचे भोजन देत आहे अशी तेथील विद्यार्थ्यानी तक्रार केल्याने भोजन व्यवस्थेवरील ठेकेदारांने गुंडामार्फत वसतीगृहातील विद्यार्थ्यांवर हल्ला घडवून आणल्याचा गंभीर प्रकार दि. २६ ऑक्टोंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आला, हे खरे आहे काय,

(२) असे प्रकार कंत्राटी कामगार व कंत्राटदार नेमल्यामुळे होत असल्याने शासनाच्या वसतीगृहावर शासन नियुक्त कर्मचारी नेमणे याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१४-१०-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) शासकीय वसतिगृहांत भोजन व्यवस्थेसाठी शासन नियुक्त कर्मचारी नेमण्याची बाब शासनाच्या विचाराधीन नाही.

तथापि, सदर प्रकरणास जबाबदार असलेल्या भोजन ठेकेदारावर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याचा भोजन ठेका रद्द करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच, असे प्रकार घडू नयेत म्हणून खबरदारी घेण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## काटोल व नरखेड (जि.नागपूर) तालुक्यातील शेतकऱ्यांना बंधनकारक अटींमुळे अपात्र ठरवून सावकारी कर्ज मुक्तीचा लाभ मिळत नसल्याबाबत

**(२०) ३८७२३ (२२-१२-२०१५). डॉ.आशिष देशमुख (काटोल) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) काटोल व नरखेड (जि.नागपूर) तालुक्यातील शेतकरी तालुका कार्यक्षेत्राची अट, ७/१२ धारकांच्या रेशन कार्डवर कर्जदाराचे नाव नसणे, ७/१२ धारक व्यक्तींच्या कुटुंबातील एकाच व्यक्तीला कर्ज मिळणार, या बंधनकारक अटींमुळे अपात्र ठरवून सावकारी कर्ज मुक्तीचा लाभ मिळत नाही हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तालुका कार्यक्षेत्राची अट रद्द करुन जिल्हा कार्यक्षेत्र करणे, ७/१२ धारक व्यक्तीच्या रेशन कार्डावर कर्जदाराचे नाव असणे बंधनकारक नसणे, या अटी रद्द करण्याची मागणी जनप्रतिनिधी व कर्जदारांकडून होत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या शेतकऱ्यांच्या मागणीबाबत शासन परीपत्रकात आवश्यक सुधारणा करुन शेतकऱ्यांना सावकारी कर्जातून मुक्त करण्यासाठी काही कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२५-०७-२०१६) :**(१) होय.

शासन निर्णय क्रमांक एमएलए- १०१५/- प्र.क्र. २५/७-स, दि.१० एप्रिल, २०१५ मधील लाभार्थ्याच्या पात्रतेच्या निकषानुसार अपात्र शेतक-यांना सावकारी कर्जमुक्तीची लाभ मिळत नाही.

(२) कर्जदाराकडून व मा. जनप्रतिनिधीकडून लेखी स्वरुपात कोणत्याही प्रकारचे प्रत्यक्ष निवेदन जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर याच्याकडे प्राप्त झालेले नाही.

(३) याबाबत विधी व न्याय विभाग तसेच वित्त विभागाचा सल्ला घेण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चुकीच्या नोटीफिकेशनमुळे एसटी महामंडळाच्या**
**बसला टोल भरावा लागत असल्याबाबत**

**(२१) ३९२५९ (२०-०१-२०१६). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने दिनांक १३ ऑगस्ट, २००४ रोजी काढलेल्या चुकीच्या परिपत्रकामुळे एसटी महामंडळाच्या बसला गेली ११ वर्षे टोल भरावा लागत आहे, ही वस्तुस्थिती सजग नागरिक मंचाच्याद्वारे शासनाच्या निदर्शनास आणुन दिली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने काढलेल्या परिपत्रकामध्ये बस या शब्दामुळे घोळ होऊन मुंबई पुणे एक्सप्रेस वे वरील टोल वसुलीत एसटी बसेसच्या भाडयांना सवलतीचा दर निश्चित केला होता परंतु परिपत्रका मध्ये एसटी महामंडळास आतापर्यंत नाहक २० कोटी रुपयांचा भुर्दंड पडला हे खरे आहे काय,

(३) असल्यास, परिपत्रकाच्या चुकीची जबाबदारी शासनाने चौकशीअंती कोणावर निश्चित केली आहे,

(४) असल्यास, २० कोटीचा फायदा आयआरबी कंपनीला मिळाला असल्यास त्याचीही चौकशी करुन त्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१९-०७-२०१६)** :(१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

शासनाने निर्गमित केलेल्या अधिसूचनेत बस प्रवर्गाचा समावेश असून या प्रवर्गाअंतर्गत एस.टी बसेसचा समावेश आहे. सदरहू अधिसूचनेत नमुद केलेल्या पथकर वसुलीच्या दरानुसार मुंबई पुणे एक्सप्रेस वे वरील जाणा-या वाहनांची पथकर वसूली केली जाते. त्यामुळे मुंबई पुणे एक्सप्रेस वे वर एस.टी. महामंडळाच्या बसेसला पथकरातून सूट नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोल्हापूर येथील रवी सहकारी बँकेच्या चौकशीतील अनियमितता

**(२२) ४००३२ (२८-०४-२०१६). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर येथील रवि सहकारी बँकेची सहकार कायदा कलम ८८ नुसार चौकशी करण्यासाठी नेमलेल्या विभागीय सहनिबंधक या चौकशी अधिकाऱ्याने रद्द केलेल्या अहवालाच्या आधारे चौकशी केल्याची बाब माहे जानेवारी २०१६ च्या पहिल्या आठवडयात वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बँकेच्या चौकशीस सन २००६ मध्ये सुरूवात झाल्यानंतर आतापर्यंत विविध ९ चौकशी अधिकाऱ्यांनी चौकशी केली असून त्यामध्ये बँकेचे व शासनाचे लाखो रूपये खर्ची पडले आहेत, हे सुध्दा खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर चौकशी दरम्यान अवसायक मंडळींनी लाखो रूपये खर्चाचे महागडे मोबाईल खरेदी केल्याचे सुध्दा उघकीस आले असल्याने अवसायक मंडळाच्या कारभाराची चौकशी करण्याची मागणी शासनाकडे करण्यात आली आहे, हे सुध्दा खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर मागणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती, तसेच याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. सुभाष देशमुख (२९-०७-२०१६)** :(१) होय.

(२) अंशतः खरे आहे.

सदर चौकशीसाठी शासनाचे एकूण रु. ५५ हजार खर्ची पडलेले आहेत.

(३) होय.

अवसायक मंडळाच्या कारभाराची चौकशी करण्याची मागणी श्री. चंद्रकांत खोंद्रे अध्यक्ष लोकशक्ती सामाजिक संघटना, कोल्हापूर यांनी विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यांच्या कार्यालयाकडे केली आहे.

(४) श्री. सुनिल शिरापूरकर, तात्कालिन जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यांच्याविरुध्द विभागीय चौकशीचे आदेश सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दिले आहेत. त्या अनुषंगाने विभागीय चौकशीचें कामकाज हे प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी (महसूल) अधीन विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे यांच्याकडे सुरु आहे

---

**गुहागर-विजापूर आणि मनमाड-बेळगाव महामार्ग विकासाबाबत**

**(२३) ४०१८१ (२९-०४-२०१६). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गुहागर-विजापूर आणि मनमाड-बेळगाव या दोन राष्ट्रीय महामार्गांच्या प्रस्तावांना केंद्रीय रस्ते व दळणवळण मंत्रालयाने मंजुरी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हे दोन्ही महामार्ग होण्याच्या दृष्टीने शासन कोणती कार्यवाही करीत आहे वा करणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२१-०७-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) गुहागर विजापूर रस्त्याचे तपशिलवार प्रकल्प अहवाल तयार करणेची कार्यवाही मुख्य अभियंता (राष्ट्रीय महामार्ग) कोकण भवन, नवी मुंबई यांचया कार्यालयाकडून करण्यात येत आहे.

मनमाड-बेळगाव रस्त्याचे तपशिलवार प्रकल्प अहवाल करणेची कार्यवाही महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांच्यामार्फत तयार करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विदर्भातील धानाची कवडीमोल भावाने विक्री होत असल्याबाबत**

**(२४) ४०२९३ (२८-०४-२०१६). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील धान उत्पादक शेतकऱ्यांना मागील वर्षापेक्षाच्या तुलनेत ३०० ते ४०० रू. प्रति.क्विंटल धानाची खरेदी होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धानाला भाव मिळत नसल्याने बाजार समित्यात धानाची आवक घटली असल्याने याचा फायदा खाजगी व्यापारी गावोगावी जाउन कमी भावात धान खरेदी करीत आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या वर्षी अपुरा पाउस, दुष्काळ परिस्थिती, धान पिकांवर विविध रोगांची लागण, सतत नापीकीमुळे धान उत्पादक शेतकरी पुर्णत: खचला आहे हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या धान उत्पादक शेतकऱ्यांना शासनाने वाढीव भावाने धान खरेदी करण्यासाठी बाजार समित्यास निर्देशीत केले आहे हे खरे आहे काय,

(५) असल्यास, विदर्भातील धान उत्पादकांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२७-०७-२०१६) :**(१) नाही.

विदर्भातील बाजार समित्या व (MSP) किमान आधारभूत किंमत योजनेंतर्गत खरेदी केलेल्या धानाची किंमत पुढीलप्रमाणे -

| | २०१४-१५ | २०१५-१६ |
|---|---|---|
| बाजार समित्यामधील दर | १९७८ | १६११ |
| किमान आधारभूत किंमत योजनेंतर्गत खरेदी दर | १३६० | १४१० |

(२) नाही.

विदर्भ बाजार समित्यांमधील आवक व किमान आधारभूत योजनेतर्गत झालेली खरेदी पुढीलप्रमाणे आहे.

| | २०१४-१५ | २०१५-१६ |
|---|---|---|
| बाजार समित्यामधील आवक | १२०९३८ क्वि. | १५०६६६ क्वि. |
| किमान आधारभूत किंमत योजनेतंर्गत खरेदी दर | ९,७२,१८७ क्वि. | १४,०१,६९८ क्वि. |

(३) नाही.
(४) नाही
(५) विदर्भातील धान उत्पादक जिल्ह्यामध्ये किमान आधारभूत योजनांतर्गत रु. १४१०/- हमीभावाने धान खरेदी करण्यात आला आहे.
(६) प्रश्न उद्भभवत नाही

---

## कोल्हापूर- रत्नागिरी मार्गावर शिवाजी पुलास पर्यायी पुलाचे बांधकाम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(२५) ४१००८ (२९-०४-२०१६). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर - रत्नागिरी मार्गावर ब्रिटीशकालीन बांधल्या गेलेल्या पुलास १३५ वर्षांचा कालावधी उलटून गेला असून या पुलावरून वाहतूक सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पुलास पर्यायी पुल बांधण्यास मंजुरी मिळून नवीन पुल बांधकामास प्रारंभ होऊन ७० टक्के काम पूर्ण झाले आहे, परंतु विविध परवानग्यांमुळे सदर पुलाचे बांधकाम अपूर्णावस्थेत आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विभाग आपली जबाबदारी टाळत असून विविध आवश्यक परवानग्या आजतागायत घेतल्या नसल्याने नवीन पुलाचे काम अपूर्णावस्थेत राहिले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर नवीन पुलाचे काम लवकरात लवकर पुर्ण व्हावे यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या जात आहेत,
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२१-०७-२०१६)** :(१) होय.
(२) होय.
(३) नाही.

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विभाग जबाबदारी टाळत नसून, प्रश्नाधिन पुलाच्या कोल्हापूर बाजूकडील जोडमार्गासाठी पुरातत्व खात्याची परवानगी अदयाप अप्राप्त असल्याने काम अपूर्ण अवस्थेत आहे.
(४) व (५) कैंद्रीय पुरातत्व खात्याच्या अंतर्गत राष्ट्रीय स्मारक समिती नवी दिल्ली यांचे ना-हरकत प्रमाणपत्र मिळण्यासाठी राज्य व कैंद्रीय स्तरावर प्रयत्न सुरु आहेत.

---

## महाराष्ट्र शासन कृषी कर्जमाफी व कर्ज परतफेड सवलत योजना २००९ अंतर्गत उपसा जलसिंचन योजनांच्या कर्जमाफीबाबत

**(२६) ४१२२१ (२७-०४-२०१६). श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र शासनाने दि.०६-०१-२००९ रोजीच्या शासन निर्णयानुसार महाराष्ट्र शासन कृषी कर्जमाफी व कर्ज परतफेड सवलत योजना जाहिर केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पाटण जि.सातारा तालुक्यातील पाच उपसा जलसिंचन योजनांना सदरची कर्जमाफी लागू केली असून या पाच योजनांनी कर्जमाफीच्या रक्कमा कर्जखात्यावर जमा केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, काही शेतक-यांनी या संदर्भात तक्रारी केल्याने सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, पुणे यांनी अप्पर लेखापरिक्षक अधीन मा.जिल्हा विशेष लेखापरिक्षक वर्ग- १ सहकारी संस्था सांगली यांना कर्जमाफीच्या परत फेर तपासणीचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, फेरतपासणीनंतर सदरच्या योजना या कर्जमाफीमध्ये बसत नसलेबाबत कोणतेही पत्र न देता जिल्हा विशेष लेखापरिक्षक वर्ग-१ यांनी सदरच्या संस्थांना तोंडी कळविले आहे. दरम्यान सदरच्या कर्जमाफीच्या रक्कमा या संबंधीत संस्था व शेतक-यांच्या खात्यावर

जमा केल्या असून त्या शेतक-यांकडून परत घेणे शक्य नाही त्यामुळे लोकनेते बाळासाहेब देसाई सहकारी साखर कारखान्याकडे न भरता कर्जमाफीची ४१ लक्ष ७४ हजार रुपयाची रक्कम कारखान्याने भरण्यास लावण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, राज्य शासनाने शासन निर्णयाप्रमाणे उपसा जलसिंचन योजनांना कर्जमाफी देणेबाबत कोणता निर्णय घेतला आहे, निर्णय घेतला नसल्यास विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१४-१०-२०१६)** :(१) होय, हे खरे आहे.
(२) पाटण तालुक्यातील ६ उपसा जलसिंचन योजनांना शासनाकडून मंजूर होऊन आलेल्या कर्जमाफीच्या रकमा संबंधित संस्थांच्या खाती बँकेने वर्ग केलेल्या आहेत.
(३) होय, हे खरे आहे.
(४) नाही. सदर ६ उपसा जलसिंचन संस्थांना मिळालेली कर्जमाफीची रक्कम अपात्र ठरली असून त्यानुसार दि सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत संबंधित संस्थांना कर्जमाफी योजना २००९ अंतर्गत अपात्र ठरलेली रक्कम शासनाकडे जमा करण्याबाबत कळविले आहे. अपात्र कर्जमाफीची रक्कम भरणा करुन घेण्यासंदर्भात कार्यवाही सुरु असून सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने स्थगिती दिली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सहायक निबंधक (दुग्ध) नांदेड व सहकार अधिकारी श्रेणी-१ सहकारी संस्था (दुग्ध) नांदेड यांच्या अनियमित कार्यपध्दतीबाबत

**(२७) ४१६३४ (२७-०४-२०१६). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्री.गलांडे सहायक निबंधक (दुग्ध) नांदेड व श्री पवार सहकार अधिकारी श्रेणी -१ सहकारी संस्था (दुग्ध) नांदेड यांच्या अनियमित कार्यपध्दतीबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि.२१/१२/२०१५ रोजी वा त्या सुमारास मा.सहकार मंत्री.राज्यमंत्री यांना पत्रव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,
(२) सल्यास, सदर पत्राच्या अनुषंगाने मा.राज्यमंत्री महोदयांनी उध्वमनार मच्छिमार सहकारी संस्था मर्या, डोंगरगांव जि.नांदेड यासंस्थेची निवडणुक प्रक्रियेस विलंब करणा-या जबाबदार अधिकारी श्री.गलांडे यांचेवर कारवाई करण्याबाबत दोन वेळेस दि.२२ डिसेंबर,२०१५ व दि. ३०/७/२०१५ रोजी सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना पत्राद्वारे कळवूनही अद्यापी श्री गलांडे यांचेवर कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०३-०८-२०१६) :**(१) व (२) होय.

(३) श्री. गलांडे सहायक निबंधक (दुग्ध) यांच्याविरुध्द मा.मंत्री (सहकार) यांना अग्रेषित केलेल्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने आयुक्त, (दुग्ध) मुंबई, यांनी चौकशी पूर्ण करुन चौकशी अहवाल सहनिबंधक, सहकारी संस्था (दुग्ध) मुंबई यांच्या अभिप्रायासह सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था यांना सादर केला. त्यांना अहवालाच्या छाननीअंती निदर्शनास आलेल्या त्रुटीचा खुलासा विभागीय उपनिबंधक, सहकारी संस्था (दुग्ध) औरंगाबाद यांच्याकडून मागविण्यात आला असता, त्यांनी दि. ९.६.२०१६ रोजीच्या पत्रान्वये सदर खुलासा सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था यांना सादर केला. सदर अहवालावरुन श्री.गलांडे यांनी उर्ध्व मनार मच्छीमार सहकारी संस्था मर्या. डोंगरगाव ता.लोहा जि.नांदेड या संस्थेची निवडणूक घेण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही केली नसल्याने सकृतदर्शनी निदर्शनास येत असून, प्राप्त अहवालाची छाननी सुरु असून, त्यानुसार शिस्तभंगविषयक कारवाई प्रस्तावित करण्यात येत आहे.

---

**राज्य शासनाने सुमारे ६ हजार कि.मी. लांबीच्या रस्त्यांना राष्ट्रीय महामार्गाचा दर्जा देण्याबाबत**

**(२८) ४२१४६ (२९-०४-२०१६). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने सुमारे ६ हजार कि.मी. लांबीच्या रस्त्यांना राष्ट्रीय महामार्गाचा दर्जा देण्याचा प्रस्ताव केंद्र शासनास पाठविलेला होता व त्यापैकी केंद्र शासनाने २४०५ कि.मी. लांबीच्या ११ रस्त्याचे राष्ट्रीय महामार्गात रुपांतर करण्यास माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान तत्वत: मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उर्वरित रस्त्यांना मान्यता न मिळण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, या प्रकरणी पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२१-०७-२०१६) :**(१) हे खरे नाही.

केंद्र शासनाने आजपर्यंत महाराष्ट्र राज्यातील एकूण १०८५१ कि.मी. लांबीच्या ९९ रस्त्यांचे राष्ट्रीय महामार्गात रुपांतर करण्यास तत्वत: मान्यता दिली आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे येथील रुपी बँकेतील कपात केलेल्या कर्मचाऱ्यांना त्यांचा योग्य मोबदला देण्याबाबत**

**(२९) ४२३३० (२७-०४-२०१६). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील रुपी बँक वाचवायची असेल तर कर्मचाऱ्यांची कपात तसेच शिल्लक कर्मचाऱ्यांच्या रजा, वेतन यासंबधी नव्याने काही नियम केल्याशिवाय गत्यंतर नसल्याचे बँकेच्या प्रशासकीय मंडळाने ठरविले असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने हस्तक्षेप करुन या बँकेतील कपात केलेल्या कर्मचाऱ्यांना त्याचा योग्य मोबदला देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२९-०७-२०१६) :** (१) होय.

(२) रुपी.को.ऑप. बँकेच्या प्रशासक मंडळाने दि. ५.३.२०१६ रोजीच्या पत्रान्वये मान्यतेसाठी सादर केलेल्या बँकेच्या सेवकांसाठीच्या स्वेच्छा सेवानिवृत्ती योजनेस सहकार आयुक्त कार्यालयाने दि.२७.५.२०१६ रोजीच्या पत्रान्वये मान्यता दिलेली आहे. सदर योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दक्षिण मुंबईतील इलाका (प्रसिडेन्सी) विभागातील सार्वजनिक बांधकाम खात्यांच्या सरकारी इमारतींमध्ये विविध कामे करण्याच्या नावाखाली बोगस बिले तयार केल्याबाबत**

**(३०) ४३२४१ (२९-०४-२०१६). श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सरकारी इमारतींमध्ये सन २००९ ते सन २०१३ या कालावधीत विविध कामे करण्याच्या नावाखाली बोगस बिले तयार करुन १३० कोटी रुपयांचा निधी हडप करण्याचा खटाटोप संबंधित अधिकारी व कंत्राटदार (मजूर संस्था) यांच्या रॅकेटने केला होता, मात्र वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या दक्षतेमुळे रॅकेटचा हा प्रयत्न फसला असून ही सगळी कामे बोगस असल्याचे लक्षात आल्याने ती तात्काळ रद्द करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सार्वजनिक बांधकाम खात्यांच्या दक्षिण मुंबईतील इलाका (प्रसिडेन्सी) विभागातील या रद्द केल्याची यादीही प्रसिध्द केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, न झालेल्या कामासाठी कंत्राटदारांना १३० कोटी रुपये द्यावे लागले असते परंतु वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या कामांची बारकाईने चौकशी केल्यामुळे हा प्रयत्न फसला असल्याने याप्रकरणी संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करुन तसेच कंत्राटदारांविरोधात शासनाने कोणती ठोस कारवाई केली आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१९-०७-२०१६)** :(१) नाही.
(२) नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भाईचंद हिराचंद रायसोनी मल्टीस्टेट सहकारी पतसंस्था अवसायनात काढण्यात आल्याबाबत**

**(३१) ४३४९१ (२७-०४-२०१६). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भाईचंद हिराचंद रायसोनी मल्टीस्टेट सहकारी पतसंस्था ही सोळाशे कोटी रुपयांचे बेनामी व्यवहार केल्याने आणि आर्थिक अनियमिततेमुळे अडचणीत आल्याची बाब दिनांक २८ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास अवसायनात काढण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे २८ हजार ठेविदारांचे तेराशे कोटी रुपये बुडण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, रायसोनी पतसंस्थेत अनेक व्यक्तींच्या नावाने म्हणजे बेनामी ठेवी ठेवण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासन स्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२६-०७-२०१६)** :(१) होय. केंद्रीय निबंधक, सहकारी संस्था, केंद्र शासन, नवी दिल्ली यांचे आदेश दि २७.१०.२०१५ अन्वये सदर संस्था अवसायनात काढण्यात आली असून अवसायकाची नियुक्ती करण्यात आली आहे.
(२) अंशत: खरे आहे.

अवसायक, भाईचंद्र हिराचंच रायसोनी मल्टीस्टेट को-ऑपरेटीव्ह क्रेडीट सोसायटी लि. जळगाव यांच्या अहवालानुसार दि.३१.३.२०१४ अखरे संस्थेकडे एकूण ठेवी रु.११२०.४१ कोटी, कर्ज एकूण रु.८८६.२४ कोटी, गुंतवणुक रु.१८४.१६ कोटी व अचल मालमत्ता रु.४५.९४ कोटीची होती.
(३) सदर संस्थेच्या घोले रोड, पुणे शाखेच्या तपासणी अहवालामध्ये नमूद केल्यानुसार बचत खाते, चालू खाते, ठेव खाते आणि कर्ज खाते यामध्ये बेहिशोबी व संशयास्पद बेनामी व्यवहार आढळून आले आहेत.

(४) सदर संस्था बहुराज्यीय सहकारी संस्था असून सदर संस्थेचे कामकाज व नियंत्रण हे बहुराज्यीय सहकारी संस्था अधिनियम, २००२ यातील तरतुदीनुसार केंद्रीय निबंधक, सहकारी संस्था, नवी दिल्ली यांचे कडून केले जाते. राज्य निबंधकास बहुराज्यीय सहकारी संस्था अधिनियम, २००२ चे कलम १०८ च्या तरतुदीनुसार बहुराज्यीय सहकारी संस्थांचे तपासणी करण्याचा अधिकार आहे. त्यानुसार तपासणी अहवाल सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, म.रा. पुणे यांचे पत्र दि.३० एप्रिल, २०१४ अन्वये केंद्रीय निबंधक, सहकारी संस्था, नवी दिल्ली यांना पुढील कार्यवाहीस्तव सादर केला आहे.
(५) लागू नाही.

---

**धुळे जिल्हा मध्यवर्ती सहकारी ग्राहक भांडार या संस्थेचे चेअरमन व इतर संचालकांविरुध्द जबाबदारी निश्चित करुन फौजदारी गुन्हे दाखल करण्याबाबत**

**(३२) ४४५५३ (२७-०४-२०१६). श्री.अनिल (अण्णा) गोटे (धुळे शहर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्हा मध्यवर्ती सहकारी ग्राहक भांडार या संस्थेचे चेअरमन व इतर संचालकांविरुध्द जबाबदारी निश्चित करुन फौजदारी गुन्हे दाखल करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १४ जून, २०१५ रोजी वा तदनंतर अनेक वेळा मा.सहकार मंत्री यांच्याकडे पत्रव्यवहार करुनही अद्यापी कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे खरे आहे काय,
(२) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२७-०७-२०१६) :**(१) नाही.

धुळे मध्यवर्ती (घाऊक व किरकोळ) सहकारी ग्राहक भांडार लि. धुळे या संस्थेच्या विशेष लेखापरिक्षण अहवालाच्या आधारे कलम ८३ अन्वये चौकशी करुन, त्या चौकशीच्या आधारे संस्थेच्या आर्थिक नुकसानीची जबाबदारी निश्चित करण्यासाठी कलम ८८ नुसार चौकशी करण्यासाठी तालुका उपनिबंधक सहकारी संस्था, धुळे यांची नियुक्ती केली होती. या नियुक्तीविरुध्द अर्जदारानी केलेले अपील विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक विभाग, नाशिक यांनी फेटाळल्यानंतर मा.राज्यमंत्री (सहकार व पणन) यांचेकडे दाखल केलेल्या पुनर्निरिक्षण अर्जावर आदेश पारित करुन विभागीय उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे यांचे आदेश रद्द करण्यात आले आहेत.
(२) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दापोली (जि.रत्नागिरी) तालुक्यातील केळशी खाडीवरील पुलाची दिशा बदलण्याबाबत**

**(३३) ४५१८५ (२९-०४-२०१६). श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दापोली (जि.रत्नागिरी) तालुक्यातील केळशीमध्ये सागरी महामार्गावरील केळशी खाडीपूलाच्या जवळ असलेली वाळूची टेकडी दिवसेंदिवस ढासळत चालल्याने सदर टेकडीला

पुरातत्व विभागाने सरंक्षण द्यावे अशी मागणी व याचिका इतिहास संशोधकांनी न्यायालयात दाखल केल्यानंतर न्यायालयाने सदर वाळूच्या टेकडीला पुरातत्व विभागाने संरक्षित करावे असे आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आदेशाच्या अनुषंगाने वाळूची टेकडी सुरक्षित करण्याबाबतच्या कामाची सद्य:स्थिती काय आहे व केळशी खाडीवरील पुलाची दिशा बदलण्याचे आदेश सार्वजनिक बांधकाम विभागास न्यायालयाने दिले आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, केळशी खाडीवरील पुलाची दिशा बदलण्याच्या कामाची सद्य:स्थिती काय आहे व सदर पूल किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२१-०७-२०१६) :**(१), (२) व (३) प्रणवतीर्थ मिशन, पुणे या संस्थेने मुंबई उच्च न्यायालयात दाखल केलेल्या जनहित याचिका क्र.१५७/२००६ च्या अनुषंगाने दि.११/४/२००७ च्या न्यायालयीन आदेशान्वये केळशी खाडीवरील पुलाचे काम जैसे थे स्थितीत बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

प्रश्नांकित पुलाची मूळ आखणी वाळूच्या टेकडीवरुन जात असल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाने मूळ आखणीत बदल करण्याविषयीचे शपथपत्र दि.२१/८/२००७ रोजी उच्च न्यायालयात सादर केले आहे.

मा.न्यायालयाने या संदर्भात दिलेल्या निर्देशाप्रमाणे पूलाच्या परिसराचे व नवीन प्रस्तावित परिक्षण राष्ट्रीय समूह विज्ञान संस्था, गोवा यांच्यामार्फत करण्यात आले आहे. या संस्थेने दिलेल्या सूचनांप्रामणे कांदळवनाची लागवड ही सा.बा.विभागामार्फत करण्यात आली आहे व प्रस्ताव MCZMA यांच्याकडे पाठविण्यात आला आहे. पूलाचा सुधारीत मांडणी नकाशा तयार करण्यात आली असून मंजूरीची प्रक्रीया प्रगतीत आहे. या प्रक्रियेचा विचार करुन या न्यायालयास या प्रकरणी सुनावणी लवकर घेवून स्थगिती आदेश उठवण्याबाबत का.अ.,सा.बां.वि., चिपळून यांनी दि.२७/११/२०१५ रोजीच्या पत्रान्वये विनंती केली आहे.

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांची स्थगिती उठल्यानंतर सुधारीत मांडणी आराखड्यानुसार पुलाचे काम सुरु करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्ह्यात सहकारी संस्थांच्या सर्वेक्षणाचे काम संथगतीने सुरु असल्याबाबत**

**(३४) ४५३१६ (२७-०४-२०१६). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या आदेशानुसार राज्यातील सहकारी संस्थांच्या सर्वेक्षणाचे काम सुरु असून कोल्हापूर जिल्ह्यात मात्र हे काम अत्यंत संथगतीने सुरु असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या जिल्ह्यातील सहकारी संस्थाचे सर्वेक्षणाचे काम माहे नोव्हेंबर, २०१५ च्या अखेरपर्यंत किती झाले आहे,

(३) असल्यास, सर्वेक्षणाचा अहवाल शासनास सादर केला आहे काय,
(४) असल्यास, त्या अहवालानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२०-०७-२०१६) :** (१) नाही, हे खरे नाही.
(२) माहे नोव्हेंबर २०१५ अखेर १०० % सर्वेक्षण कामकाज पूर्ण झाले आहे.
(३) व (४) होय. सर्वेक्षण अहवालावर सहकार आयुक्त कार्यालयाकडून कार्यवाही करण्यात येत आहे. सर्वेक्षणात आढळून आलेल्या बंद/कार्यस्थगित/ठावठिकाणा नाही अशा संस्थांबाबत अवसायनाची कार्यवाही सुरु आहे.
(५) लागू नाही.

---

**महाराष्ट्र राज्यातून उद्योग स्थलांतरित होत असल्याबाबत**

**(३५) ४६१७८ (२७-०४-२०१६). श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्यातून अनेक उद्योग शेजारील राज्यात स्थलांतरित होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, इतर काही शेजारील राज्यात उद्योगासाठी लागणाऱ्या विजेचे दर कमी असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील उद्योजकांच्या अडचणी लक्षात घेऊन राज्यशासन औद्योगिक विजेचे दर कमी करण्याच्या दृष्टीने लवकरच सकारात्मक निर्णय घेणार असल्याचे मा. उद्योगमंत्री यांनी माहे जानेवारी, २०१६ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, अथवा घेण्यात येणार आहे, याबाबत शासनाची काय भूमिका आहे?

**श्री. सुभाष देसाई (२०-०७-२०१६) :**(१) अशा प्रकारचे कोणतेही निवेदन/अर्ज शासनास प्राप्त झाले नाहीत.
(२) इतर राज्यांच्या तुलनेत महावितरणाच्या वीजदरांचा एकांगी विचार केल्यामुळे महावितरणचे वीजदर सकृत दर्शनी जास्त दिसत असले तरी विजेच्या दरांवर परिणाम करणाऱ्या घटकांचा पण विचार करणे आवश्यक आहे. महाराष्ट्रात उच्चदाब औद्योगिक ग्राहकांना मोठ्या प्रमाणात सवलती उपलब्ध आहेत. जसे रात्रीच्या कालावधीतील वीज वापरावर प्रति युनिट १.५० रु. सवलत, लोड फॅक्टर इंन्सेटिव्ह (१५% पर्यंत), पॉवर फॅक्टर इंन्सेटिव्ह (७% पर्यंत) अतिउच्च दाब औद्योगिक ग्राहकांसाठी ३% सवलत, विहित मुदतीच्या आत बिल भरल्यास १% सवलत अशा एकूण २६% पर्यंत सवलती उपलब्ध आहेत. वरील सर्व सवलतींचा एकत्रित विचार केल्यास आणि ग्राहकाने वीज वापराचे सुनियोजन केल्यास उच्चदाब

औद्योगिक ग्राहकांचे सरासरी वीज देयक निश्चितच मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकते. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या आदेशानुसार उपलब्ध सवलती विचारात घेतल्यास उद्योगांचे दर मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकतात. तसेच राज्यातील पात्र नवीन उद्योगांना गट "क", "ड", "ड+" ना-उद्योग जिल्हे व नक्षल प्रभावित क्षेत्रात १५ वर्ष व गट "अ" व "ब" क्षेत्रात ७ वर्ष विद्युत शुल्क माफी करण्यात आली आहे.

(३) व (४) विदर्भ व मराठवाडा या प्रदेशातील औद्योगिक विकासास चालना देण्याकरिता या विभागाचा उर्वरित महाराष्ट्र तसेच शेजारील राज्यांच्या औद्योगिक व इतर घटकांचा तुलनात्मक अभ्यास करुन अहवाल सादर करण्याकरिता शासनाने विभागीय आयुक्त, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली दि.२९/९/२०१५ च्या शासननिर्णयान्वये समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीच्या अहवालानुसार विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, D व D+ क्षेत्रातील औद्योगिक ग्राहकांना वीजदरात सवलत देण्याबाबत ऊर्जा विभागाने दि.२९/६/२०१६ रोजी शासन निर्णय निर्गमित केला.

सदर शासन निर्णयानुसार खालीलप्रमाणे सवलती देय केल्या आहेत :-

अ) इंधन समायोजन आकार सवलत :

विदर्भ :- ४० पैसे प्रति युनिट

मराठवाडा :- ३० पैसे प्रति युनिट

उत्तर महाराष्ट्र :- २० पैसे प्रति युनिट

ब) नवीन उद्योगांकरिता प्रोत्साहन पर सवलत :

विदर्भ :- ०.७५ प्रति युनिट

उत्तर महाराष्ट्र,

D व D+ Zone :- ०.५० प्रति युनिट

क) तसेच उद्योगांच्या कार्यक्षमतेवर आधारित सवलती देय करण्यात आल्या आहेत.

---

**नाशिक येथे गाडगेबाबांच्या स्मारकाला मंजूरी देण्याबाबत**

**(३६) ४६६६० (१७-०५-२०१६). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथे गोदावरी काठावर गाडगेबाबांनी बांधलेल्या आश्रमशाळेच्या जागेत गाडगेबाबांचा पूर्णाकृती पुतळा बसविण्याचा प्रस्ताव गत पाच वर्षापासून मंत्रालयातील वास्तु विशारद विभागाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर स्मारकांना मंजूरी देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-१०-२०१६) :**(१), (२) व (३) नाशिक महानगरपालिकेने दिनांक २९/१२/२०१४ रोजी सादर केलेल्या प्रस्तावस सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुख्य वास्तूशास्त्रज्ञ यांनी दिनांक १४/६/२०१६ रोजी मान्यता प्रदान केली आहे.

यसंदर्भात नाशिकत महानगरपालिकेने जिल्हाधिकारी यांच्याकडे प्रस्ताव सादर केला आहे.जिल्हाधिकारी ,नाशिक यांनी महानगरपालिकेस आवश्यक कागदपत्राची पूर्तता करण्याबाबत कळविले आहे. सदर कागदपत्रांच्या पूर्ततेसह व विहित कार्यपदतीनूसार जिल्हाधिकारी यांच्याकडून प्रस्ताव शासनास प्राप्त झाल्यानंतर पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

---

**आंबा (ता.शाहुवाडी,जि.कोल्हापूर) येथील शासकीय विश्रामगृह बंद असल्याबाबत**

**(३७) ४६८८७ (२९-०४-२०१६). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शाहुवाडी तालुक्यातील आंबा हे गिरीस्थान प्रति महाबळेश्वर म्हणून ओळखले जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पर्यटकांसाठी आंबा हे बाराही महिने निसर्गरम्य हॉटस्पॉट बनले असून राष्ट्रीय महामार्गाच्या शेवटच्या टोकाला हे एकमेव विश्रामगृह आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, विश्रामगृह बंद असल्याने मंत्री, वरिष्ठ अधिकारी, पदाधिकारी यांचा राबता कमी झाला असून सर्वांना कोल्हापूर, पन्हाळा किंवा कोकणचा मार्ग धरावा लागतो हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सहा वर्षे बंद असलेले विश्रामगृह पर्यटकांना सुसज्ज करून देण्यासाठी शासन कोणती कार्यवाही करणार आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२१-०७-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) अग्रक्रम, निकष व निधी उपलब्धतेनुसार काम पुर्ण करणे नियोजित आहे.

---

**मौजा देव्हाडी (ता.तुमसर, जि.भंडारा) येथील रेल्वे क्रॉसींग ओव्हरब्रीजच्या कामासाठी वापरण्यात येणा-या गौण खनिजाची लॅबकडून तपासणी न करता वापरले जात असल्याबाबत**

**(३८) ४७५३० (२९-०४-२०१६). श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा), श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा देव्हाडी (ता.तुमसर, जि.भंडारा) येथील रेल्वे क्रॉसींग ओव्हरब्रीजच्या कामासाठी वापरण्यात येणा-या गौण खनिजाची लॅबकडून तपासणी न करता, गौण खनिज वापरले जात असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान शासनाच्या निदर्शनास आणून दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१९-०७-२०१६) :**(१) नाही.

प्रश्नाकिंत कामासांठी वापरण्यात येणा-या गौण खनिजांच्या निकषाप्रमाणे आवश्यक चाचण्या घेण्यात आल्या आहेत.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### सावकारी कर्जातील शेतक-यांसाठी कर्जमुक्ती अभियान राबविण्याबाबत

**(३९) ४८०४२ (२८-०४-२०१६). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील १९ हजार ५१५ शेतकऱ्यांना सावकारी कर्जातून मुक्त करण्यासाठी शासनाद्वारे गठीत जिल्हा समितीने कर्जबाजारी शेतकऱ्यांपैकी २ हजार ८९९ शेतकऱ्यांना कर्जमुक्ती देण्यात आल्याने फक्त १५ टक्केच सावकारीमुक्ती झाल्याचे माहे जाने २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सावकारी कर्जातील शेतकऱ्यांची संख्या लक्षात घेता विदर्भ आणि मराठवाड्यातील १४ जिल्ह्यांसाठी कर्जमुक्ती अभियान राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२९-०७-२०१६) :**(१) नाही.

अमरावती जिल्ह्यामध्ये परवानाधारक सावकाराकडून कर्ज घेतलेल्या १२,८८३ कर्जदार शेतक-यांना लाभार्थीच्या पात्रतेच्या निकषानुसार सावकारी कर्जमाफीचा लाभ देण्यात आला आहे.

(२) शासन निर्णय क्रमांक एमएलए १०१५/प्र.क्र.२५/७-स, दि. १० एप्रिल, २०१५ मधील लाभार्थीच्या पात्रतेच्या निकषानुसार कर्जबाजारी शेतक-यांना सावकारी कर्जमुक्तीचा लाभ देण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**तिवसा (ता.जि.अमरावती) येथील शासकीय विश्रामगृहाचे अतिरिक्त**
**सुट बांधकामासह सुधारणा करण्याबाबत**

**(४०) ४८३८६ (२९-०४-२०१६). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिवसा (ता.जि.अमरावती) येथे अनेक विविध प्रशासकीय कार्यालये असून तसेच मोझरी येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराजाच्या समाधी स्थळाला अतिमहत्वाचे व्यक्ती, शासकीय अधिकारी व हजारो भाविक वर्ग नियमित भेट देत असतात परंतू येथील शासकीय विश्रामगृह हे तालूका स्तरावर असल्याने अपुरे पडत आहे तसेच या ठिकाणी सुसज्ज अद्यावत हॉटेल नसल्याने येणाऱ्या भाविक वर्ग, अतिमहत्वाचे व्यक्ती, शासकीय अधिकारी यांची गैरसोय होत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तिवसा येथील विश्रामगृहाचे अतिरिक्त सुट बांधकामासह सुधारणा करण्याकरीता आवश्यक निधी शासन मंजुर करणार वा करीत आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२१-०७-२०१६) :**(१) होय.

तिवसा व मोझरी स्थळाचे महत्व लक्षात घेता येथील विश्रामगृहात अतिरिक्त सुट बांधकामासह सुधारणा करण्याकरीता निधी मंजूर करण्याबाबत मा.ॲड.यशोमती ठाकूर, आमदार, तिवसा, जि.अमरावती यांनी माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये शासनाकडे विनंती केलेली होती.

(२) दोन्ही विश्रामगृहात एक अतिरिक्त कक्षाचे बांधकाम करणे व इतर सुधारणा निधीच्या उपलब्धतेनुसार करण्यात येईल.

(३) विलंब झालेला नाही.

---

**गडचिरोली जिल्हयातील आदिवासी संस्थांचे थकीत असलेले कमिशन देण्याबाबत**

**(४१) ४८५६० (२९-०४-२०१६). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्हयातील आदिवासी विविध सहकारी संस्थांचे कमिशन मागील १० वर्षापासून महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाकडे थकीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी संस्थांचे थकीत असलेले कमिशन देण्याबाबत महामंडळाने काय कारवाई केली आहे,

(३) असल्यास, थकीत कमिशन कधीपर्यंत आदिवासी संस्थांना देण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२०-०७-२०१६) :**(१) हे खरे नाही.
आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्थेवर खरेदी झालेल्या धानाची हुंडी मधुन एकुण कमिशनच्या ४०% कमिशन रक्कम संस्थांना परस्पर मिळत असते. उर्वरित ६०% कमिशन रक्कम धान खरेदीचे व्यवहार पुर्ण झाल्यावर अदा करण्यात येतात.
(२) आदिवासी संस्थांकडून कमिशन मिळणेबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर छाननी अंती संस्थांना देय रकमा अदा केल्या जातात.
(३) ज्या संस्थांची घट २०% पेक्षा कमी आहेत अशा संस्थांच्या कमिशनच्या रक्कमा आर्थिक वर्षानुसार अदा केल्या जातात.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील सहकारी पतसंस्था तसेच सहकारी बँका यांचेवर**
**एम.पी.आय.डी. कायद्याखाली कारवाई करण्याबाबत**

**(४२) ४९४६१ (२७-०४-२०१६). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.महेश (दादा) लांडगे (भोसरी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील लाखो गुंतवणूकदारांना लुबाडणाऱ्या सहकारी पतसंस्था तसेच सहकारी बँका यांचेवर एम.पी.आय.डी. कायद्याखाली कारवाई करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एम.पी.आय.डी. कायद्याखाली या संस्थांवर कारवाई करण्याचे मा. सर्वोच्च न्यायालयाचे आदेश असतानाही या संस्थांवर कारवाई न करण्याची कारणे काय आहेत,
(३) राज्य शासन या संदर्भात काय कारवाई करणार आहे ?

**श्री. सुभाष देशमुख (२९-०७-२०१६) :** (१) अंशतः खरे आहे.
महाराष्ट्र ठेवीदार अधिनियम(एम.पी.आय.डी) १९९९ मधील तरतूदी सहकारी संस्थांना लागू होत नसल्याने या अधिनियमानुसार कार्यवाही करणे उचीत नाहीत. तथापि मा. उच्च न्यायालयाने त्यांच्या दिनांक २०.१२.२०१३ रोजीच्या आदेशान्वये दि पेण अर्बन को. ऑप बँक लि. पेण या बँकेबाबत उपरोक्त कायद्याखाली कार्यवाही करण्याचे निर्देश दिलेले असल्याने त्यानुसार महाराष्ट्र ठेवीदार अधिनियम (एम.पी.आय.डी),१९९९ मधील तरतूदीनुसार कार्यवाही सुरु आहे.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आदिवासी कुटुंबाना शबरी घरकुल योजनेकरीता सरकारी अनुदाना बाबत.**

**(४३) ४९५१८ (२९-०४-२०१६). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील बेघर किंवा ज्यांची घरे कुडाची असून अशा आदिवासी कुटुंबाना सरकारी

अनुदानातून घर देण्याकरिता शबरी घरकुल योजनेकरीता सन २०१३ मध्ये तरदूत करण्यात आलेला ५०० कोटी रुपये निधी पडून आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या निधीचा विनियोग अद्यापपर्यंत न करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, यांस जबाबदार असणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, याबाबतची सद्य: स्थिती काय आहे ?

**श्री. विष्णु सवरा (१९-०७-२०१६) :** (१) नाही, हे खरे नाही.

सन २०१२-१३ मध्ये रु.५००/- कोटी निधी उपलब्ध नसून रु.३०.००कोटी इतका निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला होता. त्यापैकी रु.२३.४१ इतका प्रत्यक्ष खर्च झाला आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सुभेदारी विश्रामगृह येथील झालेले निकृष्ट कामे व अभियंता यांनी केलेल्या गैरव्यवहाराबाबत**

**(४४) ४९५४८ (२९-०४-२०१६). श्री.संजय शिरसाट (औरंगाबाद पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यामध्ये भयाण दुष्काळी परिस्थिती असताना औरंगाबाद येथील सुभेदारी विश्रामगृह येथे करोडो रुपयाचे ई -टेन्डरींगचे भाग करून नियमबाहय कामे केली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामध्ये अभियंता श्री.डी.एस.कांबळे,जेई व श्री. सुखदेवे, कार्यकारी अभियंता यांनी केलेला मोठया प्रमाणात गैरव्यवहार झालेला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, अनावश्यक खरेदीबाबत संबंधीतावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) याबाबत शासनाने अधिक चौकशी केलेली आहे काय, कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-०७-२०१६) :**(१) अशा आशयाच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.

(२), (३) व (४) तक्रारीच्या अनुषंगाने अधीक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद यांचेमार्फत चौकशी करण्यात येत आहे.

---

**राज्यातील ९० हजार सहकारी संस्थांचे अस्तित्व धोक्यात आल्याबाबत**

**(४५) ५०४५८ (२७-०४-२०१६). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने दिनांक १५ जून, २०१५ रोजी सहकारी संस्थांची तपासणी घेण्याचा निर्णय

घेतल्यामुळे राज्यातील ९० हजार सहकारी संस्थांचे अस्तित्व धोक्यात आल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अवसायकांच्या ताब्यात दिलेल्या संस्थांना लेखापरीक्षणासाठी मुदतवाढ देण्याची सहकारी संस्था व हौसिंग सोसायटी बचाव समित्यांची मागणी आहे,

(३) असल्यास, सदर संस्थांना मुदत देऊन त्या पुन्हा सभासदांच्या ताब्यात देण्यासाठी प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय ?

**श्री. सुभाष देशमुख (२७-०७-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) होय.

(३) ज्या सहकारी संस्था दिलेल्या पत्यावर अस्तीत्वात नाहीत किंवा बंद वा कार्यस्थगीत असल्याचे सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०२ अन्वये अवसायनांचे अंतिरम आदेश काढले आहेत.

सहकारी गृह निर्माण संस्थांच्या संदर्भात सहकार आयुक्त कार्यालयाने दि. ३०.३.२०१६ रोजी परिपत्रक निर्गमित केले आहे. त्या अन्वये सहकारी गृहनिर्माण संस्थांनी संबंधित निबंधकांनी निश्चित केलेल्या कालावधीत त्रुटीची पूर्तता केल्यास त्या त्या गृहनिर्माण संस्थांचे अवसायकाचे अंतरिम आदेश मार्ग घेण्यात येतील

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ज्या शेतकऱ्यांनी सावकाराकडून कर्ज घेतले आहे त्यांच्या कर्जमाफीबाबत**

**(४६) ५०८२३ (२७-०४-२०१६). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शासनाने विदर्भ व मराठवाड्यातील शेतकऱ्यांना सावकारी कर्जापासून मुक्त करण्यासाठी सन २०१४ -१५ या आर्थिक वर्षात ज्या शेतकऱ्यांनी सावकाराकडून कर्ज घेतले आहे त्यांच्या कर्जमाफीची घोषणा केली होती व अद्यापही अनेक शेतकऱ्यांना या कर्जमाफीचा लाभ मिळालेला नसल्याचे दिनांक १५/०२/२०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे ,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सावकाराकडून कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांची एकूण संख्या किती आहे व त्यापैकी किती शेतकऱ्यांना कर्ज माफी देण्यात आली आहे व किती शेतकरी कर्जमाफीपासून वंचित आहेत,

(३) असल्यास, शासनाने यासाठी किती निधीची तरतूद केली असून आतापर्यंत किती निधी वितरीत करण्यात आला आहे व सदर सर्व कर्जदार शेतकऱ्यांना या माफीचा लाभ मिळण्यास विलंबाची सर्वसाधारण कारणे कोणती आहेत,

(४) असल्यास, सदर विलंबास जबाबदार असणाऱ्यावर शासन स्तरावरून कोणती कार्यवाही करण्यात येत आहे वा आली आहे?

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२६-०७-२०१६) :**(१) अंशतः खरे आहे.

(२) परवानाधारक सावकारांकडून कर्ज घेणा-या शेतक-यांची संख्या ३,१०,८२० असुन त्यापैकी ४६,८०९ शेतक-यांना कर्जमाफी देण्यात आली. जे कर्जदार शेतकरी हे कर्जमाफीबाबतच्या शासन निर्णयातील लाभार्थीच्या पात्रतेच्या निकषांची पुर्तता करीत नाहीत त्यांना जिल्हास्तरीय समितीने अपात्र ठरविलेले आहे. शासन निर्णयानुसार पात्र शेतकरी कर्जमाफीपासून वंचित नाही.

(३) विदर्भ व मराठवाड्यातील परवानाधारक सावकारांकडून शेतक-यांनी घेतलेल्या कर्जास माफी देण्यास शासनाने रु.१७१.३० कोटी रकेची तरतुद केली होती व त्यानुसार शासनाने रु.६५.०० कोटी एवढा निधी उपलब्ध करुन दिलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील बंद असलेल्या सहकारी संस्थाना आर्थिक मदत देऊन त्या सुरु करण्याबाबत

**(४७) ५१२१२ (२७-०४-२०१६). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील बंद असलेल्या ४९३०४ सहकारी संस्थाना आर्थिक मदत देऊन त्या पुनश्च सुरु करण्याची घोषणा मा.सहकार मंत्री महोदयांनी दिनांक १९ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बंद सहकारी संस्था सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, सदर संस्था सुरु करण्यास किती निधीची आवशकता असून शासनाने किती निधीची तरतूद केली आहे वा करणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२०-०७-२०१६) :**(१) हे खरे नाही.

शासनाने अशी कोणतीही योजना जाहीर केलेली नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चाळीसगांव (जि.जळगांव) तालुक्यातील भडगाव रस्त्यावरील खरजई नाक्यावर गतीरोधक बसविण्याबाबत

**(४८) ५१८५४ (२९-०४-२०१६). श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाळीसगांव व तालुक्यातील (जि.जळगांव) धडगाव रस्त्यावरील खरजई नाक्यावर अपघात

टोळण्यासाठी गतीरोधक बसविण्याची मागणी करुनही गतीरोधक बसविण्यात आले नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्यावर गतीरोधक बसविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२१-०७-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) व (३) खरजई नाक्याच्या दोन्ही बाजूस गतीरोधक बसविण्यात आले आहेत व रस्ता सुरक्षा उपाय योजनानुसार इतर सुरक्षा योजना उदा.झेब्रा पेंटींग इ.करण्यात आले आहे.

---

**रुपी बँक गैरव्यवहारातील दोषी व्यक्तींकडून रक्कम वसूल करण्यासाठी सहकार उपनिबंधक दर्जाच्या अधिकाऱ्याची निमणूक करण्याबाबत**

**(४९) ५३२३३ (२७-०४-२०१६). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रुपी बँक गैरव्यवहारातील दोषी व्यक्तींकडून रक्कम वसूल करण्यासाठी सहकार उपनिबंधक दर्जाच्या अधिकाऱ्याची निमणूक करण्याचा निर्णय सहकार आयुक्त यांनी दि. ३ मार्च रोजी वा त्या दरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रक्कम वसुली काटेकोरपणे व्हावी यासाठी काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२९-०७-२०१६) :** (१) होय.
श्री. एम.व्ही.गरड, उपनिबंधक, सहकारी संस्था यांची रुपी को.ऑप.बँकेवर विशेष कार्य अधिकारी म्हणून दि. १७..०६.२०१६ रोजी नियुक्ती करण्यात आली आहे.
(२) महाराष्ट्र सहकारी संस्थ्ज्ञा अधिनियम, १९६० चे कलम - ९८ अन्वये वसुली प्रमाणपत्राची अंमलबजावणी करण्याची कार्यवाही चालू आहे. सदरील रक्कम संबंधीतांने भरणा न केल्यास जमिन महसुलाची थकबाकी वसुल करण्याच्या पध्दतीप्रमाणे वसुल करण्यात यावी असे आदेश पारित करण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**लंडन येथील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे वास्तव्य असलेला बंगला उच्च शिक्षणासाठी जाणाऱ्या दलित समाजाच्या विद्यार्थ्यांना हॉस्टेल म्हणून वापरण्याबाबत**

**(५०) ५३४७४ (२८-०४-२०१६). श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लंडन येथील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे वास्तव्य असलेला बंगला राज्य शासनाने सुमारे ३२ कोटी रुपये किमतीला विकत घेतला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बंगल्याचा वापर आता तेथे उच्च शिक्षणासाठी जाणाऱ्या दलित समाजाच्या विद्यार्थ्यांना हॉस्टेल म्हणून करण्याबाबत शासनाने वेळोवेळी जाहिर केले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, आता शासनाने उपरोक्त निर्णय बदलून सदर बंगल्यामध्ये बाबासाहेब आंबेडकर स्मारक, समग्र लिखाण व वाचनालय सुरु करण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, बंगल्याच्या खरेदीसाठी राज्य शासनाने निधी दिला नसल्याने महात्मा फुले मागासवर्गीय महामंडळाच्या निधीतून या बंगल्याची खरेदी करण्यात आली आहे काय,
(५) असल्यास, सदर बंगल्यामध्ये स्मारक व ग्रंथालयाचे उद्घाटन करण्यासाठी संबंधित विभागाचे मंत्री लंडनमध्ये जाणार आहेत, हे ही खरे आहे काय ?

**श्री. राजकुमार बडोले (११-०७-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी वास्तव्य केलेले लंडन स्थित घराची किंमत ३.१ मिलियन पौंड (रु. ३१.०० कोटी) तसेच स्टॅम्प ड्युटी, सॉलिसिटर यांची फी, कायदेशीर खर्च, विनिमय दराच्या फरकांची रक्कम, इतर अनुषंगीक खर्च इत्यादी सह घर खरेदी करण्यासाठी एकूण रु. ३५,९५,६७,०००/- इतक्या खर्चास शासन निर्णय दिनांक ०६.११.२०१५ अन्वये प्रशासकीय मंजूरी देण्यात आली आहे.
(२) सदरचा उपयोगासंदर्भातील बाबी शासनस्तरावर विचाराधीन आहेत.
(३) शासन स्तरावर प्रस्ताव विचाराधीन आहे.
(४) महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळाच्या भागभांडवलाच्या निधीतून तात्पुरती व्यवस्था म्हणून घेतलेला निधी रु. ४,२२,६१,७९८/- एवढया रकमेची प्रतिपूर्ती महामंडळास करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.